**प्रेसनोट** दि. २७/०६/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून मा. भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे येथील दोन लिपीकांवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. रविंद्र हिंदूराव पवार, वय ४० वर्ष, पद- लिपिक, (वर्ग-३)<br>२) श्री. अमित बबन भुसारी, वय ३४ वर्ष, पद - लिपिक, दोघे नेमणुक - भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे. (वर्ग ३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- (पस्तीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | २५/०३/२०२५ |
| सापळा दिनांक | २७/०६/२०२५ |
| ठिकाण | हॉटेल राधा प्युअर व्हेज, सिंहगडरोड, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा विठ्ठलवाडी, सिंहगड रोड, हिंगणे खुर्द येथील विशाल पार्क या सोसायटीमधील फ्लॅट भाडेतत्त्वावर दिलेला होता. परंतु त्यांचे फ्लॅट मधील भाडेकरु सदरचा फ्लॅट खाली करत नसल्याने तक्रारदार यांनी मा. सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे येथे खटला दाखल केला होता. त्या खटल्याच्या अनुषंगाने मा. सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालयाने तक्रारदार यांच्या बाजुने निकाल देवून भाडेकरुच्या ताब्यात असलेल्या फ्लॅटचा ताबा तक्रारदारास देणे बाबत आदेश दिला होता. सदर आदेशाची पूर्तता करून तक्रारदाराचा संबंधित फ्लॅट भाडेकरूच्या ताब्यातून काढून घेऊन फ्लॅटचा ताबा तक्रारदारास देण्यासाठी मा. न्यायालयाने त्यांच्या न्यायालयातील लिपिक लोकसेवक क्र. १. श्री. रविंद्र हिंदूराव पवार व लोकसेवक क्र. २- श्री. अमित बबन भुसारी यांना नेमले होते. मा.न्यायालयाच्या आदेशावर कार्यवाही करून वादातील फ्लॅटचा ताबा तक्रारदारास देण्यासाठी लिपीक लोकसेवक क्र. १. श्री. रविंद्र पवार व लोकसेवक क्र. २. श्री. अमित भुसारी यांनी तक्रारदारांकडे ४०,००० रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदाराने दि. २१/३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २५/०३/२०२५ रोजी विठ्ठलवाडी, सिंहगड रोड हिंगणे खुर्द, पुणे येथे पंचासमक्ष पडताळणी केली असता, लिपीक लोकसेवक क्र. १ - श्री. रविंद्र पवार व लोकसेवक क्र. २ - श्री. अमित भुसारी यांनी मा. भाडे नियंत्रण कायदा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करून तक्रारदाराचा वादग्रस्त फ्लॅट भाडेकरुच्या ताब्यातून सोडवुन त्याचा ताबा देण्यासाठी तक्रारदाराकडे सुरवातीस ४०,००० रुपयाची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती ३५,००० रुपयांची लाच मागितल्याचे व ती लाच रक्कम मा. न्यायालयाचे आदेशाची पुर्तता झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. २७/६/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लिपीक लोकसेवक क्र. १. श्री. रविंद्र पवार व क्र. २. श्री. अमित भुसारी यांनी मा. भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारदाराच्या वादग्रस्त फ्लॅटचा ताबा भाडेकरुकडून काढून घेऊन तक्रारदाराच्या ताब्यात दिला. ताबा देण्याची कारवाई पूर्ण झाल्यानंतर लिपीक लोकसेवक क्र. १ श्री. रविंद्र पवार व क्र. २ श्री. अमित भुसारी यांनी राधा प्युअर व्हेज, सिंहगड रोड, पुणे या हॉटेलच्या बाहेर रोडवर मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तक्रारदाराच्या फ्लॅटचा ताबा त्यांना मिळवून दिल्याच्या मोबदल्यात त्यांनी तक्रारदाराच्या गाडीमध्ये तक्रारदाराकडून ३५,०००/- रुपयाची लाच रक्कम स्वीकारल्यानंतर लिपीक लोकसेवक क्र. १ व क्र. २ यांना रंगेहात पकडण्यात आले असून, त्या दोघांविरुद्ध सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००

३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.